नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

# हिंगोली कृषी हवामान सल्ला

शुक्रवार, दिनांक— ०५.०२.२०२१

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक ०६ ते १० फेब्रुवारी, २०२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०६/०२ | ०७/०२ | ०८/०२ | ०९/०२ | १०/०२ |
| पाऊस (मिमी) | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३३.० | ३२.० | ३१.० | ३१.० | ३२.० |
| किमान तापमान (अं.से.) | १५.० | १४.० | १२.० | १४.० | १५.० |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५९ | ५५ | ५४ | ५७ | ५५ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३५ | ३४ | ३४ | ३० | ३० |
| वा-याचा वेग (किमी / तास) | १२ | १५ | १२ | ४ | ४ |
| वा-याची दिशा | ईशान्य | ईशान्य | ईशान्य | ईशान्य | ईशान्य |

| हवामानाचा इशारा | हवामान अंदाजानुसार जिल्हयात पुढील पाच दिवस आकाश स्वच्छ राहील. आजपासून पुढील दोन ते तीन दिवस किमान तापमानात 2 ते 4 अं.से. ने घट होण्याची शक्यता आहे.. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| रब्बी ज्वारी | वाढीची अवस्था | रब्बी ज्वारी पिक फुलोरा ते दाने भरणे अवस्थेत असताना उपलब्धतेनूसार पाणी व्यवस्थापन करावे. रब्बी ज्वारी पिकावर माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यस्थापनासाठी डायमेथोएट 30% ईसी 13 मीली प्रती 10 लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| गहू | वाढीची अवस्था | गव्हाच्या पिकात उंदरांचा प्रादुर्भाव दिसून आल्यास याच्या नियंत्रणासाठी झिंक फॉस्फाईड 1 भाग + गुळ 1 भाग + 50 भाग गव्हाचा भरडा व थोडसे गोडतेल मिसळून हे मिश्रण उंदराच्या बिळात टाकुन बिळे बंद करावीत. गहू पिकात तांबेरा रोगाच्या व्यवस्थापनासाठी झायनेब किंवा मॅन्कोझेब (75 डब्ल्यूपी) 25 ग्रॅम प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून वारणी कराची. |
| केळी | फळ लागणे अवस्था | मृग बाग लागवड केलेल्या केळी बागेत सिगाटोगा रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रोपीकोनाझोल 10 मीली + स्टिकर प्रती 10 लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. केळी बागेत फळाची प्रत चांगली राहण्यासाठी केळीच्या घडाणा झाकून घ्यावे. बागेत पाणी व्यवस्थापन करावे. |
| आंबा | मोहोर लागणे अवस्था | आंब्यामध्ये मोहोर फुलण्याच्या अवस्थेमध्ये शक्यतो फवारणी टाळावी जेणेकरून परागीकरणावर परिणाम होणार नाही. गरज पडल्यासच तुडतूडयांच्या व्यवस्थापनासाठी 5 % निंबोळी अर्क अथवा थायमिथाक्झाम 25 % दोन ग्रॅम प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून |

| | | |
|---|---|---|
| | | फवारणी करावी. भुरी व करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी हेक्झाकोनेझॉल पाच मिली प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून वारणी करावी. |
| द्राक्षे | घड वाढणे अवस्था | द्राक्षे बागेत पाणी व्यवस्थापन करावे. द्राक्षे बागेत भुरी रोगाच्या व्यवस्थापनासाठी उपाययोजना कराव्यात. |
| भाजीपाला | वाढीची अवस्था | टोमॅटो पिकावरील फळ पोखरणा-या अळीच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस 25% 20 मिली किंवा क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल 18.5% 3 मिली किंवा इन्डोक्झाकार्ब 14.5% एससी 10 मिली किंवा लॅमडा सायहॅलोथ्रीन 5 ईसी 6 मिली प्रती 10 लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. भाजीपाला पिकात तणनियंत्रण करून पाणी व्यवस्थापन करावे. |
| फुल शेती | काढणी अवस्था | काढणीस तयार असलेल्या गुलाब, शेवंती, जिलारडिया फुलांची काढणी करून घ्यावी. फुलपिकात तणनियंत्रण करून पाणी व्यवस्थापन करावे. ऊन्हाळी हंगामात जिलारडियाची लागवड करण्यासाठी रोपवाटीकेत रोपे तयार करावीत. |
| तुती रेशीम उद्योग | -- | रेशीम कोषाचा ए-ग्रेड उत्त्म प्रकारे मिळवण्यासाठी किटक संगोपन कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. खाद्य म्हणून तुती पानात पाण्याचे प्रमाण 80 टक्के मर्यादित ठेवणे आवश्यक आहे. हलक्या जमिनीत 6 ते 7 दिवसाला तर भारी जमीनीत 10-12 दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळया द्याव्यात. खत मात्रा; वर्षातून कंम्पोस्ट खत 2 वेळा जुन व नोव्हेंबर महिण्यात 4 टन प्रत्येकी (एकूण 8 टन एकरी) द्यावे म्हणजे वर्षाकाठी एकरी 25 टन पानाचे उत्पादन मिळते. दुस-या वर्षापासून 250 अंडिपूजाची 5 ते 6 पीके घेणे शक्य होते. 200 कि. ग्रा. कोषाच्या उत्पन्नास रू. 300/- प्रति किलो भाव मिळला तरी 60,000/- प्रमाणे 5 पिकाचे रू. 3 लक्ष उत्पन्न शेतक-याला मिळते. |
| सामुदायिक विज्ञान | | भाजी, वरण, भाकरी किंवा सुप करताना, वाळलेल्या शेवग्याच्या शेंगा, पाने, फुले यांची पावडर वापरून लोह, जीवनसत्व क, इटीऑक्सीडंट भरपूर प्रमाणात मिळवा आणि रोग प्रतिकारक क्षमता वाढवा. |

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.